जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

२९.०६.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712


## नसरापूर अत्याचार प्रकरण

# आरोपी भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

### पुणे सत्र न्यायालयाचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**पुणे** - पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायालयाने सोमवारी (दि.२९) फाशीची शिक्षा सुनावली.

पॉक्सो कायद्यांतर्गत चाललेल्या या खटल्याचा निकाल अवघ्या ५५ दिवसांत लागला असून, अत्याचार आणि हत्या प्रकरणातील राज्यातील सर्वात जलदगतीने निकाली निघालेल्या खटल्यांपैकी हा एक ठरला आहे.

**२५ जूनला दोषी, आज शिक्षेची घोषणा**

विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी यापूर्वी २५ जून रोजी झालेल्या सुनावणीत भीमराव कांबळे याला दोषी ठरवले होते. त्यामुळे आरोपीला जन्मठेप की फाशी, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सोमवारी न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा सुनावत खटल्यावर शिक्कामोर्तब केला.

**वेगवान तपासामुळे विक्रमी निकाल**

माहितीनुसार, या प्रकरणात पोलिसांनी जलद तपास करत न्यायवैद्यकीय आणि डीएनए पुराव्यांच्या आधारे अवघ्या १५ दिवसांत १,२०० पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. त्यानंतर विशेष न्यायालयातील बंद दालनात सुनावणी झाली. त्यामुळे महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासातील सर्वात वेगाने निकाली निघालेल्या खटल्यांपैकी हा एक ठरला आहे.

**सरकारी पक्षाने मागितली होती फाशी**

'मिड डे' च्या वृत्तानुसार, विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी या गुन्ह्याचे क्रौर्य सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या 'अत्यंत दुर्मिळ प्रकरण' या निकषात बसत असल्याचा युक्तिवाद करत आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. तर बचाव पक्षाने आरोपीचे वय आणि त्याने गुन्हा नाकारल्याचा मुद्दा मांडत सौम्य शिक्षेची मागणी केली होती.

**पुराव्यांच्या आधारे ठरवले दोषी**

२५ जून रोजी न्यायालयाने अनेक साक्षीदारांचे जबाब, न्यायवैद्यकीय अहवाल आणि पुराव्यांची तपासणी केल्यानंतर भीमराव कांबळे याला अपहरण, बलात्कार आणि हत्येप्रकरणी दोषी ठरवले होते. तसेच, न्यायालयाने आरोपीविरोधातील पुरावे सिद्ध झाल्याचे नमूद केले होते.

# शालेय अभ्यासक्रमात येणार थोर व्यक्तींचे नवे पुस्तक : शिक्षणमंत्र्यांचे विधानसभेत आश्वासन

### मराठी शिकवण्यास टाळाटाळ करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** - राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचा देदिप्यमान इतिहास आणि महापुरुषांची ओळख करून देण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात थोरामोठ्यांच्या कर्तृत्वाची माहिती देणारे एक नवे पुस्तक समाविष्ट केले जाईल, असे आश्वासन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सोमवारी विधानसभेत दिले. तसेच, राज्यातील सर्व शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असून, यात टाळाटाळ करणाऱ्या शाळांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिला.

भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीच्या कायद्याच्या अंमल बजावणीबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. मे २०२६ मध्ये काही खासगी, इंग्रजी माध्यम आणि केंद्रीय मंडळांच्या शाळांकडून या नियमांचे पालन होत नसल्याची बाब समोर आली होती. या शाळांवर दंडात्मक कारवाई किंवा मान्यता रद्द करण्याबाबत सरकारने काय पावले उचलली आहेत, असा सवाल भातखळकर यांनी विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना शिक्षणमंत्र्यांनी स्पष्ट केले की, सर्व शाळांमध्ये मराठी विषयाची अंमलबजावणी होते आहे की नाही, यासाठी शासन विशेष मोहीम राबवणार आहे. 'सर्व आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील शाळांमध्ये जाऊन मराठी शिक्षणाची अंमलबजावणी तपासणी करावी आणि त्याचा अहवाल सरकारला द्यावा.

## थोडक्यात

### नसरापूर प्रकरणातील फाशीच्या शिक्षेचे सुनेत्रा पवारांकडून स्वागत



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - जिल्ह्यातील नसरापूर येथील अल्पवयीन मुली-वरील अत्याचार आणि हत्येप्रकरणी न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पीडितेला आणि तिच्या कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त करत त्यांनी न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याचे म्हटले आहे. सुनेत्रा पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सांगितले की, या प्रकरणाची सुनावणी अवघ्या दोन महिन्यांत पूर्ण करून न्यायालयाने निकाल दिला.

# २० लाख रुपयांचा औषध साठा जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** - शहरातील न्यू एरा हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे.

या कारवाईत विनापरवाना साठवलेला २० लाखांहून अधिक किमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. एफडीएने रुग्णालयाच्या बेसमेंटमधून हा औषधांचा साठा जप्त केला असून, संबंधित जागेसाठी वैध औषध विक्री परवाना नसल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

औषधांच्या खरेदी-विक्रीची कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याने ही कारवाई करण्यात आली. प्रशासनाने औषधांचे दोन नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले असून, औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई प्रस्तावित आहे. प्रिस्क्रिप्शन न दिल्याने प्रकरण निदर्शनास रुग्णांना रुग्णालयाशी संलग्न मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे.

# बुलढाण्याच्या नांदुराजवळ भीषण अपघात, नागपूरहून जळगावकडे जाणारी भरधाव खाजगी प्रवासी बस पलटीली, १० ते १२ प्रवासी जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नांदुर** - बुलढाण्याच्या नांदुराजवळ भीषण अपघाताची घटना घडली आहे नागपूरहून जळगावकडे जाणाऱ्या खाजगी प्रवासी बसला नांदुरा बाह्यवळण मार्गावर अपघात झाला आहे. भरधाव प्रवासी बस पलटी झाल्याने हा अपघात झाला असून या अपघातात दहा ते बारा प्रवासी जखमी झाल्याची माहिती आहे. सध्या जखमींवर नांदुरा व खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे. दरम्यान, घटनेची माहिती महामार्ग पोलिसांनी मिळताच जखमींना तात्काळ मदत करण्यात आली. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे. मात्र हा अपघात नेमका कसा झाला, हे अद्याप काळालं नाहीये. मात्र सुदैवाने यात जीवितहानी टळली आहे.




# नागपुरात भरधाव कार थेट पोहेवाला शॉपमध्ये घुसली

### कारसह दुकानाच मोठं नुकसान, मध्यरात्री रस्त्यांवर रेसिंगच्या नादात अपघात?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नागपूर** - नागपूर शहरातून एका विचित्र अपघाताची बातमी समोर आली आहे.

शहरातील वासुदेव नगर मेट्रो स्टेशन लगत असेलेल्या पोहेवाला शॉपमध्ये भरधाव कार घुसल्याची घटना समोर अली आहे. प्राथमिक माहितीनुसार, मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास भरधाव कार अचानकपणे रोडच्या लगत असलेल्या दुकानाचे शेडमध्ये घुसली. दरम्यान, या कारचा वेग इतका अधिक होता की यामध्ये दुकानाच्या परिसरात असणाऱ्या लोखंडी साहित्य आणि पोलही वाकून गेलेत. मात्र, सुदैवाने मध्यरात्री ही घटना घडल्यामुळे दुकान परिसरात नागरिक नव्हते.

मात्र दुकानाच मोठं नुकसान झालं आहे. यात पो-हेवाल्या शॉपच जवळपास अडीच लाखाच नुकसान झाल्याची माहिती आहे. दरम्यान, मध्यरात्री शहरात उच्चभ्रू कुटुंबातील मुलं रेसिंग कार घेऊन रस्त्यावर उतरतात आणि त्यामधून अशा पद्धतीची घटना घडत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे ही गाडी भरधाव रेसिंगच्या नादात तर घुसली नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# 'समृद्धी'वर अपघात : एकाच कुटुंबातील ५ ठार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**अमरावती** - समृद्धी महामार्गावर रविवारी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास धामणगाव रेल्वे स्थानकाजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात चंद्रपूर येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. हे कुटुंब चंद्रपूरहून अमरावतीकडे येत असताना ही दुर्घटना घडली.

अपघातात भास्कर महादेव जीवने (४३), महादेव जिवाजी जीवने (६५), लताबाई महादेव जीवने (६०), आरती भास्कर जीवने (४१) आणि जिज्ञा भास्कर जीवने (१२) यांचा मृत्यू झाला. हे सर्वजण चंद्रपूर शासकीय डी.एड. महाविद्यालयामागील बहुपेठ परिसरातील रहिवासी होते. कार थेट कंटेनरच्या खाली घुसली जीवने कुटुंबीय कारने समृद्धी महामार्गावरून प्रवास करत होते. धामणगाव रेल्वे स्थानकाजवळ रस्त्याच्या कडेला एक कंटेनर उभा होता. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगातील ही कार थेट उभ्या कंटेनरच्या मागील बाजूस धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, कारचा दर्शनी भाग पूर्णपणे कंटेनरमध्ये घुसला आणि अक्षरशः चक्काचूर झाला. त्यामुळे कारमधील पाचही जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.




# बंड नव्हे, फडणवीसांचे पंख कापण्याचे षडयंत्र : उद्धव ठाकरे यांचा आरोप, ६ खासदारांना अपात्र ठरवण्याची केली मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**परभणी** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी परभणी येथील सभेत बोलताना आपल्या पक्षाच्या सहा बंडखोर खासदारांना तातडीने अपात्र ठरवण्याची मागणी केली आहे.

हे बंड म्हणजे एक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पंख कापण्याच्या षडयंत्राचा भाग आहे असा दावाही त्यांनी केला.

'ऑपरेशन देवेंद्र' असे या मोहिमेचे वर्णन करून ठाकरे म्हणाले की. २०२९ च्या निवडणुका डोळ्यापुढे ठेवून हे सर्व चालले आहे. यापूर्वी मध्य प्रदेश जिंकून देणारे शिवराजसिंह चौहान आणि नितीन गडकरी यांचे पंख असेच कापले गेले होते.

आता फडणवीस बलिष्ठ होऊ नयेत म्हणून भाजपपेक्षा शिंदे गटाचे अधिक खासदार होऊ दिले गेले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

सहा खासदारांच्या फुटीनंतर ठाकरे यांनी सध्या त्या खासदारांच्या मतदारसंघाचा दौरा सुरू केला आहे. शनिवारी ते यवतमाळ व वाशीममध्ये होते. रविवारी त्यांनी धाराशिव व परभणीचा दौरा केला आणि तेथील फुटिरांवर जोरदार टीका केली.

शिंदे यांच्या गटात सामील झालेल्या सहा खासदारांना कायद्याने अपात्र ठरवले पाहिजे. यासाठी त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल केली असून, कायद्याचे राज्य राखले जाईल, अशी अपेक्षा ठाकरे यांनी व्यक्त केली. 'आम्ही अध्यक्षांच्या अधिकारांचा आदर करतो, पण त्यांनी नियमांचे पालन केलेच पाहिजे,' असे ठाकरे म्हणाले. दरम्यान आपण कोणत्याही स्थितीत उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार नाही अशी ग्वाही धाराशिवच्या सभेत आमदार कैलास पाटील यांनी दिली.

तर ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या वडिलांच्या भ्रष्टाचाराची चौकशी लागेल या भीतीनेच शिंदे गटात प्रवेश केला असावा असा संशय संजय राऊत यांनी व्यक्त केला.

### ढोल-ताशांच्या गजरात आमनेर येथे

# मोहरम (ताजीया) मिरवणुक उत्साहात व शांततेत संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यातील आमनेर येथे मुस्लिम बांधवांचा पवित्र मोहरम (ताजीया) उत्सव धार्मिक श्रद्धा, उत्साह आणि शांततेच्या वातावरणात मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला. यानिमित्त पारंपरिक पद्धतीने ताजियाची मिरवणुक गावातील प्रमुख मार्गांवरुन काढण्यात आली. मिरवणुकीत मुस्लिम बांधवांसह सर्वधर्मीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

(मोहरम) हा इस्लामी (हिजरी) वर्षाचा पहिला महिना आहे. हा महिना विशेषतः मुस्लिम समाजासाठी पवित्र मानला जातो. विशेषतः शिया मुस्लिमांसाठी हा शोकाचा काळ असतो. या महिन्याच्या १० व्या दिवशी (आशुरा) या ऐतिहासिक घटनेची आठवण केली जाते. या दिवशी ईमाम हुसायन ईबन अली (प्रेषित मोहम्मद यांचे नातु) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी न्याय व सत्यासाठी लढताना बलिदान दिले.



भारतात मोहरमच्या काळात अनेक ठिकाणी ताजिया मिरवणुका काढल्या जातात, मजलिस (धार्मिक सभा) आयोजित केल्या जातात, काही लोक उपवास आणि प्रार्थना करतात, शिया समाजात करबला येथील हौतात्म्याचे स्मरण करून शोक व्यक्त केला जातो. मोहरम हा सणापेक्षा स्मरण आणि शोकाचा काळ मानला जातो, विशेषतः इमाम हुसेन यांच्या बलिदानाच्या आठवणीसाठी.

मोहरमनिमित्त धार्मिक विधी व प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि धार्मिक घोषणांसह ताजियाची मिरवणुक काढण्यात आली.

मिरवणुकी दरम्यान भाविकांनी ताजियाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. युवकांनी पारंपरिक कसरतींचे सादरीकरण करुन उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुक शांततेत पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता तसेच ग्रामपंचायत, मोहरम उत्सव समिती व गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचे दर्शन घडविणारा हा उत्सव गावात शांततेत संपन्न झाला.

# सराफा लाईन परिसरातून दुचाकीची चोरी

### अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – शहरातील गजबजलेल्या सराफा लाईन रोडवरील कृषी केंद्रासमोरुन एक दुचाकी अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना २६ जून २०२६ रोजी सकाळी घडली आहे. याप्रकरणी वरुड पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निलेश वैजनाथ मेश्राम (४१) हे २६ जून रोजी सकाळी वरुड येथील सराफा लाईन रोडवर असलेल्या गांधी कृषी सेवा केंद्र येथे आले होते. त्यांनी आपली हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल दुकानाच्या बाजूला पार्क केली. मात्र, घाईगडबडीत त्यांच्याकडून दुचाकीचे हँडल लॉक करायचे राहून गेले. निलेश मेश्राम हे बाजारात आपले काम आटोपून साधारण तासाभराने परत आले असता, त्यांना आपली दुचाकी त्या ठिकाणी दिसून आली नाही. त्यांनी आजूबाजूच्या परिसरात दुचाकीचा बराच शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने हँडल लॉक नसलेल्या संधीचा फायदा घेऊन अंदाजे २५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरुन नेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

याप्रकरणी निलेश मेश्राम यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्टवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा कलम ३०३, २(ब) गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पावसाच्या आगमनामुळे शेतकरी सुखावला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### जरूड परिसरात खरीप हंगामातील पेरणी शेवटच्या टप्प्यात



**जरूड** – परिसरात मृग नक्षत्राच्या शेवटच्या चरणात झालेल्या पावसाने शिवाय सतत ५ ते ६ दिवसापासून अधून मधून होणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणी धरली. आणि पाहता पहाता या परिसरातील खरीप हंगामातील पेरणी आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. सुरुवातीला पाऊस वेळेवर न आल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण तयार झाले होते.शेवटी पाऊस दाखल झाल्याचे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसुन येत आहे.

गेल्या ३ दिवसांपासुन पीक पेरणी पुरता पाऊस आल्याने येथील शेतकऱ्यांनी कपाशी, तूर, ज्वारी, मूंग, सोयाबीन, तिळ, बरबटी, भुईमूग, एरंडी आदी पिकांची पेरणी करण्यात आली असल्याचे समजते. सद्य: तरी पाऊस समाधानकारक आहे असला तरी पुढे काय नवलाई घेऊन येईल, हे वेळच सांगणार आहे. जरुड परिसरात खरिप हंगामाची पेरणी शेवटच्या टप्प्यात आली आहे.

# आरोग्य विभागाची मोठी कारवाई, माढा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकासह ९ कर्मचाऱ्यांच निलंबन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**सोलापूर** – सोलापूर जिल्ह्यातील माढा ग्रामीण रुग्णालयाच्या संदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. या रुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. विलास मेमाणे यांच्यासह एकूण नऊ कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आलं आहे. १४ महिन्यापूर्वी घडलेल्या एका धक्कादायक घटनेनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या या निर्णयामुळं एकच खळबळ उडाली आहे. आरोग्य विभागानं हा निर्णय का घेतला? याबाबतची माहिती पाहुयात.

मागील वर्षी म्हणजे एप्रिल २०२५ मध्ये माढा ग्रामीण रुग्णालयातील एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. प्रसुती झालेल्या महिलेकडून ग्रामीण रुग्णालयातील वॉर्डची स्वच्छता करुन घेतल्याची घटना समोर आली होती. प्रसुती नंतर या महिलेने आठ दिवस स्वच्छता केली होती. या घटनेनंतर सर्वच स्तरातून संताप व्यक्त करण्यात येत होता. माढा तालुक्यातील खैराव येथील हेमा धडे (वय ३०) या १ एप्रिल २०२५ रोजी प्रसुतीसाठी रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्याच दिवशी रात्री त्या प्रसुती झाल्या. त्यांचे सीझर झाले होते. त्यामुळं त्या रुग्णालयातच ॲडमीट होत्या. या काळात त्यांचे पतीव त्यांच्याकडून रुग्णालयातील वॉर्डची व स्वच्छतागृहाची स्वच्छता करुन घेण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. या घडनेचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. या घटनेनंतर माढ्यातील सामिजीक कार्यकर्ते शंभू साठे यांनी संबंधित विभागाला जाब विचारत धारेवर धरले होते. तसेच या प्रकरणी वैदियकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात यावं अशी देखील मागणी केली होती. त्यानंतर आरोग्य विभागां चौकशी सुरु केली होती.

# बिल्डरांनी ढापलेली जमीन सरकार कशी परत घेणार?

### नाशिक म्हाडा प्रकरणावरून अनिल परब विधान परिषदेत संतापले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**मुंबई** – नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रात भूखंडांची बेकायदेशीर पोटविभागणी करून म्हाडाच्या घरांचा आणि राखीव जागांचा कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी आज विधान परिषदेत केला. नाशिक महापालिका हद्दीत नियमांच्या कचाट्यातून वाचण्यासाठी विकासक आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने जमिनीचे बेकायदेशीर तुकडे पाडण्यात आल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावर उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या प्रकरणी ४९ जणांवर गुन्हे दाखल झाले असून १८ ऑगस्टपर्यंत चौकशी अहवाल समोर येईल, अशी ग्वाही दिली.

विधान परिषदेत बोलताना अनिल परब म्हणाले की, 'नाशिकसह महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रात १९८१ च्या परिपत्रकाचे उल्लंघन करून जमिनीची पोटविभागणी केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. 'ना हरकत प्रमाणपत्र' न घेताच ४००० चौ.मी. पेक्षा लहान प्लॉट पाडले गेले. ७/१२ वेगळे करून ले-आऊट मंजूर करताना म्हाडाचे २० टक्के राखीव, १० टक्के ओपन स्पेस आणि ५ टक्के सुविधा क्षेत्रही नाहीसे करण्यात आले. २०१३ पासून १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांमध्ये विकासक, अधिकारी आणि नगररचना विभागाच्या संगनमताने हा घोटाळा सुरू असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. शासनाने एमआरटीपी कायद्यानुसार सखोल चौकशी करून बेकायदेशीर ले-आऊट रद्द करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.'

बिल्डरांनी ढापलेली जमीन सरकार कशी परत घेणार? परब पुढे म्हणाले, 'नाशिक महापालिकेत नियमातून वाचण्यासाठी ४ हजार चौ.मी. होऊ नये म्हणून त्या जमिनीचे तुकडे पाडण्यात आले. याचा हिशोब किती होतो हे आता तुम्हीच ठरवा. ४९ लोक सोडले तर बाकी लोकांवर तुम्ही काय कारवाई केली? या बिल्डरांनी ढापलेली जमीन परत कशी घेणार आहात? हे केवळ नाशिकमध्ये नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. असा थेट सवाल त्यांनी सरकारला विचारला.

### देशात तेलाचे दर कधी कमी करणार?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर आता पश्चिम आशियातील युद्ध सुरू होण्यापूर्वीच्या पातळीवर आले आहेत, तरीही देशात तेलाचे दर स्वस्त का झाले नाही, असा सवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केंद्र सरकारला केला आहे. कच्च्या तेलाचे भाव कोसळत आहेत, तरीही पेट्रोल-डिझेल-गॅसचे दर कमी करण्याऐवजी मोदी सरकार लोकांच्या बचतीवर गदा आणत आहे, असे त्यांनी 'एक्स'वरील 'पोस्ट' केलेल्या संदेशात म्हटले आहे.

# मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा

### राजुरा बाजार रस्त्यावरील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – येथील राजुरा बाजार रस्त्यावरील एका इलेक्ट्रिक बाईकच्या शोरुमजवळून दोन मोबाईल फोन चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलीसांत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजेंद्र गजानन सातफळे (४८) हे उमेश ब्राम्हणे यांच्या राजुरा बाजार येथील इलेक्ट्रीक बाईकच्या शोरुमजवळ असताना ही चोरी झाली.

आरोपी विनोद मानकर (४८) आणि त्याचे इतर दोन साथीदार (ज्यांचे पूर्ण नाव व पत्ता अद्याप माहिती नाही) यांनी संगनमत करुन फिर्यादीचे साधारण १८ हजार ५०० एकूण किमतीचे दोन मोबाईल फोन चोरुन नेले. यामध्ये एक मोबाईल फोन ९ हजार ५०० किमतीचा तर दुसरा मोबाईल फोन ९ हजार किमतीचा होता.

फिर्यादीने आपले मोबाईल फोन परत मागितले असता, आरोपीने तुम्ही मला मोबाईल मागू नका, नाही तर तुम्हाला भारी पडेल, अशी थेट धमकी दिली. यानंतर फिर्यादी राजेंद्र सातफळे यांनी वरुड पोलीस ठाण्यात रितसर तक्रार नोंदवली.

वरुड पोलिसांनी याप्रकरणी कलम ३०३, ३५१ (२), ३५१(३) अन्वये चोरी आणि धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# संपादकीय

**अडचणी माणसाला थांबवत नाहीत, त्या त्याला अधिक मजबूत बनवतात.**

## कठोर शिक्षेच्या पलीकडचा प्रश्न

समाजाच्या संवेदनशीलतेला हादरा देणाऱ्या आणि संपूर्ण महाराष्ट्राला संतप्त करणाऱ्या नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्या प्रकरणात न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावत 'आता फासावर चढा' अशा कठोर शब्दांत आपला निर्णय नोंदविला. या निर्णयामुळे केवळ एका चिमुकलीला न्याय मिळाला असे नाही, तर न्यायव्यवस्थेवरील समाजाचा विश्वासही अधिक दृढ झाला आहे. अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या या खटल्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर न्यायालयाच्या या निर्णयाने पीडित कुटुंबाला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.
कोणत्याही समाजाची सभ्यता आणि प्रगती ही त्या समाजातील महिला व बालकांच्या सुरक्षिततेवर अवलंबून असते. परंतु गेल्या काही वर्षांत अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, लैंगिक शोषण आणि हत्या यांसारख्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. अशा घटना घडतात तेव्हा केवळ एक व्यक्ती किंवा कुटुंब पीडित होत नाही, तर संपूर्ण समाजाची माणुसकीच जखमी होते. नसरापूर येथील या प्रकरणानेही समाजमन सुन्न केले होते. निष्पाप चिमुकलीवर झालेला अत्याचार आणि त्यानंतर तिची झालेली निर्घृण हत्या या घटनेने प्रत्येकाच्या मनात संतापाची भावना निर्माण केली होती. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तपास यंत्रणांनी केलेली जलद आणि प्रभावी कारवाई. पोलिसांनी अल्पावधीत आरोपीला अटक करून पुरावे गोळा केले आणि न्यायालयासमोर भक्कम बाजू मांडली. सरकारी वकिलांनीही अत्यंत प्रभावी युक्तिवाद करत आरोपीचा गुन्हा सिद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. परिणामी न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावली. अशा प्रकरणांत तपासातील त्रुटी किंवा पुराव्यांचा अभाव यामुळे अनेकदा आरोपी सुटून जातात. त्यामुळे या प्रकरणात तपास यंत्रणांनी दाखविलेली तत्परता कौतुकास्पद आहे. तथापि, फाशीची शिक्षा ही अंतिम उपाय असली तरी केवळ कठोर शिक्षेमुळेच अशा घटना थांबतील, असे मानणे चुकीचे ठरेल. गुन्हेगारांना शिक्षेची भीती असणे आवश्यक आहे, परंतु त्याचबरोबर समाजातील मानसिकता बदलणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्त्रिया आणि बालकांविषयी आदर, संवेदनशीलता आणि समानतेची भावना बालपणापासूनच रुजविण्याची गरज आहे. कुटुंब, शाळा, समाज आणि प्रसारमाध्यमे यांनी यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात मुलांवर होणारे विविध प्रकारचे मानसिक आणि सामाजिक परिणामही दुर्लक्षित करता येणार नाहीत. इंटरनेट, सामाजिक माध्यमे आणि अश्लील सामग्रीचा सहज उपलब्ध होणारा प्रवेश अनेकदा विकृत मानसिकतेला खतपाणी घालण्याचे काम करतो. त्यामुळे पालकांनी मुलांच्या वर्तनाकडे बारकाईने लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि योग्य संस्कार करणे अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये लैंगिक शिक्षण, नैतिक मूल्ये आणि संवेदनशीलतेवर आधारित शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे.

# डॉलरच्या बदल्यात रुपयाला 'खडकुची' किंमत? आपली अर्थव्यवस्था ढासळली का?

विदर्भातील एक मार्मिक म्हण आहे - रुपयाला खडकुची किंमत आली. म्हणजे रुपयाची किंमत इतकी घसरली की १०० रुपयांत फक्त १ डॉलर मिळतो. म्हणजेच आपला रुपया कवडीमोल झाला - खडकूसारखा.

पूर्वी १ डॉलर = ७-८ रुपये होता. ९० च्या दशकात २०-२५ रुपये. आज ८७-८८ रुपये मोजावे लागतात. म्हणजे १०० रुपयाची नोट काढली की डॉलर १.१५ च्या आसपास मिळतो. म्हणूनच म्हणतात, पैशाला किंमत राहिली नाही, खडकू झाला.

ही म्हण चिंता व्यक्त करते. रुपया घसरला की आयात महाग होते. खत, बी-बियाणं, तेल महाग पडतं. सर्वसामान्यांचा खर्च वाढतो. म्हणून 'खडकू' हा शब्द टोचणारा आहे. ही म्हण तांत्रिक नाही, पण माणसाच्या मनातलं सत्य आहे. अर्थव्यवस्था ऋउझ्ञ ने मोजता येत नाही. महागाईचा मार पडला की माणूस असंच बोलू लागतो.

आजकाल चहाच्या टपरीपासून सोशल मीडियापर्यंत एकच चर्चा आहे. 'डॉलर ८७-८८ वर गेलाय, रुपया कोलमडलाय. देशाची अर्थव्यवस्था खडकुची झाली का?' हा प्रश्न ऐकून चिंता वाटणं स्वाभाविक आहे. पण उत्तर देण्याआधी 'खडकुची' म्हणजे काय आणि रुपया-डॉलरचा खेळ नेमका कसा चालतो ते समजून घेऊ.

रुपया घसरतोय, पण का? रुपया म्हणजे चलनाचा भाव. जसं टोमॅटोची किंमत मागणी-पुरवठ्यावर ठरते, तसंच रुपयाची किंमतही डॉलरच्या तुलनेत ठरते. गेल्या २-३ वर्षांत रुपया ७४ वरून ८७-८८ पर्यंत गेलाय. म्हणजे १ डॉलर विकत घ्यायला आपल्याला जास्त रुपये मोजावे लागतात. याला 'रुपयाचं अवमूल्यन' म्हणतात.

कारणं ३ आहेत: पहिलं, अमेरिकेचा व्याजदर. फेडरल रिझर्व्हने व्याजदर ५% च्या आसपास ठेवल्याने जगभरातील गुंतवणूकदार पैसा अमेरिकेकडे खेचला जातोय. ते डॉलर विकत घेतात, रुपया विकतात. डॉलरची मागणी वाढली की किंमत वाढते.

दुसरं, कच्चं तेल आपण दररोज ८५% कच्चं तेल आयात करतो. तेलाचं बिल डॉलरमध्ये असतं. डॉलर महाग झाला की आपल्याला जास्त रुपये मोजावे लागतात. हे पैसे पुन्हा रुपयातून डॉलरमध्ये बदलले जातात, त्यामुळे रुपयावर दबाव येतो.

तिसरं, FPI म्हणजे विदेशी गुंतवणूकदार. शेअर मार्केटमध्ये पडझड झाली की ते आपला पैसा काढून डॉलरमध्ये नेतात. रुपया विक्रीचा दबाव वाढतो.

'खडकुची' म्हणजे ढासळली का? खडकुची म्हणजे पूर्णपणे किंमत नसलेली गोष्ट. पण रुपयाचं तसं नाही. २०१३ मध्ये रुपया ६८ वर गेला होता, २०२० च्या कोविडमध्ये ७६ वर. प्रत्येक संकटात रुपया घसरतो, नंतर सावरतो. ८७-८८ हा आकडा ऐतिहासिक नीचांक आहे, पण 'खडकुची' नाही.

खरं मापदंड काय? अर्थव्यवस्थेचा पाया. भारताची GDP वाढ अजूनही ६-७% आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आपलीच आहे. परकीय चलनाचा साठा म्हणजे Forex Reserve ६०० बिलियन डॉलरपेक्षा जास्त आहे. म्हणजे १०-१२ महिन्यांचं आयात बिल आपण सहज फेडू शकतो. १९९१ सारखी दिवाळखोरीची परिस्थिती नाही.

रुपया घसरणं म्हणजे अर्थव्यवस्था ढासळणं नाही. चीनचा युआन, जपानचा येन, युरो सुद्धा डॉलरसमोर घसरले आहेत. कारण डॉलरच आज मजबूत आहे, रुपया एकटा कमकुवत नाही. याला 'डॉलर स्ट्रेंथ' म्हणतात.

घसरणीचे तोटे आणि फायदे तोटे लगेच दिसतात. पेट्रोल-डिझेल महाग होतं कारण तेल आयात महागते. LPG, स्वयंपाकाचं तेल, इलेक्ट्रॉनिक्स, औषधं यांच्या किमती वाढतात. महागाईचा फटका सर्वसामान्याला बसतो. विदेशात शिक्षण, ट्रीप महाग होते.

पण दुसरी बाजू पण आहे. रुपया स्वस्त झाला की आपला माल परदेशात स्वस्त पडतो. टेक्सटाईल, औषधं, खढ सेवा, हिऱ्यांची निर्यात वाढते. 'मेक इन इंडिया' ला बळ मिळतं. परदेशी पर्यटक भारतात स्वस्तात येतात, त्यामुळे टुरिझमला फायदा होतो. परदेशात असलेले भारतीय जास्त रुपये पाठवतात.

म्हणजे रुपया घसरणं हे फक्त वाईट नाही. नियंत्रित घसरण निर्यातीला मदत करते. पण झपाट्याने, अनियंत्रित घसरण धोकादायक असते.

RBI काय करते? रिझर्व्ह बँक हातावर हात ठेवून बसलेली नाही. तिच्याकडे २ शस्त्रं आहेत. एक, Forex Reserve मधून डॉलर विकून बाजारात पुरवठा वाढवणे. त्यामुळे डॉलरची किंमत आटोक्यात राहते. गेल्या वर्षभरात ठइख ने ५०-६० बिलियन डॉलर विकले आहेत.

दोन, व्याजदर वाढवणे. भारतात व्याजदर जास्त ठेवले की ऋझख पैसा काढून नेत नाहीत. उलट भारतात येतात. पण RBI रुपया कृत्रिमपणे ७५ वर अडकवून ठेवू शकत नाही. तसं केलं तर रिझर्व्ह संपेल. त्यामुळे ठइख 'घसरण मंद' करण्याचं काम करते, घसरण थांबवत नाही.

मग चिंता करायची का? हो, बेफिकीर राहता येणार नाही. कारण रुपया घसरणं हे लक्षण आहे, आजार नाही. आजार आहे तो 'आयात अवलंबित्व'. आपण तेल, सौर पॅनल, सेमीकंडक्टर, खते यासाठी डॉलरवर अवलंबून आहोत. जोपर्यंत हे अवलंबित्व कमी होत नाही, तोपर्यंत रुपया डॉलरसमोर दबावात राहील.

पण घाबरण्याची गरज नाही. १९९१ मध्ये आपल्याकडे फक्त १ बिलियन डॉलर होते. आज ६००+ बिलियन आहेत. बँकिंग सिस्टीम मजबूत आहे. डिजिटल पेमेंट, णझख मुळे अर्थव्यवस्थेत पारदर्शकता आली आहे.

खडकुची नाही, पण दक्षता हवी डॉलरच्या तुलनेत रुपयाला खडकुची किंमत नाही. तो अजूनही जगातील स्थिर चलनांपैकी एक आहे. अर्थव्यवस्था ढासळली नाही, ती आव्हानांच्या टप्प्यातून जातेय. जागतिक मंदी, युद्ध, तेलाच्या किमती याचा फटका सगळ्यांनाच बसतोय. खरा प्रश्न हा आहे की आपण फक्त रुपया-डॉलरचा भाव बघणार का, की निर्यात वाढवणार, आयात कमी करणार, मॅन्युफॅक्चरिंग मजबूत करणार? रुपया मजबूत करायचा असेल तर 'मेड इन इंडिया' ला ताकद द्यावी लागेल. रुपया घसरला म्हणून निराश न होता, आपण प्रत्येकाने स्वदेशी वस्तू वापरणं, अनावश्यक आयात कमी करणं, बचत करणं याने सुरुवात करू शकतो. कारण मजबूत रुपया सरकार एकटं बनवत नाही, १४० कोटी लोक मिळून बनवतात.



शेषराव नर्मदा गोपाळ कडू
मो.नं.९९२३९८८७३४
वरुड

# ती शिवसेना आता राहिली नाही!

शिवसेना उबाठाचे सहा खासदार बंड करून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे गेले. दरम्यान उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी 'दिसेल तेथे तुडवा, हाणा, मारा एवढेच नव्हे तर राडा करा' असे आदेश देऊनही फारसे कुठे तुडवायचे प्रकार झाल्याचे दिसत नाही.

शिवसेनेचा एकेकाळी खूप मोठा दरारा होता; परंतु आता ती परिस्थिती तेथे राहिली नाही. ठाणे महापालिका निवडणुकीत बंडखोरी झाली. श्रीधर खोपकर या नगरसेवकाची हत्या झाली. त्या खटल्यामध्ये आनंद दिघे यांना अटक झाली. या अटकेच्या निषेधार्थ संपूर्ण ठाणे, पालघर, नाशिक या जिल्ह्यात तीव्र पडसाद उमटले होते. खोपकर हत्याकांड बाजूलाच राहिले; परंतु आनंद दिघे हेच त्याचे हिरो ठरले. ती परिस्थिती आता कुठे दिसत नाही. यापूर्वी बंड करणाऱ्या नेत्याला तुडवा, हाणा, मारा असे आदेश देण्याची प्रथा कधी नव्हती. स्वयंस्फूर्तीने शिवसैनिक बंडखोरांच्या विरोधात रस्त्यावर उतरत असत. आता आदेश देऊनही त्याचा फारसा काही उपयोग होत नाही. छगन भुजबळ यांनी १९९१ मध्ये नागपूर येथे बंडखोरी केली होती. त्यावेळी ते तेथे नागपूर अधिवेशनापर्यंत पोहचू शकत नव्हते. पोलीस संरक्षणातच त्यांना विधान भवनामध्ये यावे लागले. त्यानंतर नारायण राणे यांच्याबाबतही तेच घडले. निवडणुकीत नारायण राणे यांचा पराभव व्हावा यासाठी दस्तुरखुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे



कणकवली, सावंतवाडी येथे प्रचारसभेसाठी गेले होते. बंड करणाऱ्यांना भीती होती. आता ती राहिल्याचे या बंडानंतर दिसले नाही.

बाळासाहेबांच्या पश्चात हा धाक संपला आहे. याची कारणे बरीच आहेत. त्यावेळी बाळासाहेबांच्या समवेत निष्ठावंत नेते होते. मनोहर जोशी, दत्ताजी साळवी, दत्ताजी नलावडे, सुधीरभाऊ जोशी, लीलाधर डाके, मधुकर सरपोतदार असे अनेक दिग्गज नेते होते. शिवसेनाप्रमुखांना अटक करण्याचे नाटक झाले, त्यावेळी उभा महाराष्ट्र पेटून उठला होता. त्यावेळी मुख्यमंत्री असलेले विलासराव देशमुख यांनी तर कानावर हात ठेवले होते. आज ती परिस्थिती दिसत नाही. आज शिवसेनेकडे धाक राहिला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मुंबईतील बॉम्बस्फोट, जातीय दंगली उभ्या महाराष्ट्राने पाहिल्या. त्यावेळी गुजराती व अन्य बांधवांचे रक्षण शिवसेनेने केले. आता मात्र मराठी मराठीत्तर, जातीपातीच्या भिंती उभ्या केल्या जात आहेत.

मराठवाड्यात शिवसेना पोहचली ती खऱ्या अर्थाने नामांतराच्या चळवळीच्या नंतर. बाळासाहेबांनी मराठवाड्याची अस्मिता हा प्रमुख मुद्दा हाती घेऊन नामांतराला विरोध केला होता. त्यानंतर मराठवाड्यात शिवसेना घरोघरी पोहचली. मोरेश्वर सावे हे पहिले शिवसेनेचे महापौर होते. या सहा बंडखोर खासदारांपैकी तीन खासदार हे मराठवाड्यातील आहेत. आहेत ते ओरिजिनल शिवसेना उबाठामधून २०२४ मध्ये निवडून आलेले. त्यांनी आता शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. शनिवारी यवतमाळ येथे उद्धव ठाकरे यांची सभा झाली. प्रतिसाद चांगला मिळाला; परंतु तो उत्साह दिसत नव्हता. यापूर्वी बंडखोरांना पळताभुई थोडी व्हायची. सन २०२२ मध्ये जून महिन्यात शिवसेनेच्या विरोधात मोठे बंड झाले. ४० आमदारांनी मूळ शिवसेना सोडली आणि ते शिंदे गटात सामील झाले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. सत्ता नसल्याने अनेक पडझडी सुरू झाल्या. या पडझडीत मंत्रिपद सोडून शिंदे गटात सामील झाले हे पहिल्यांदा घडले. या पहिल्या बंडखोरीनंतर जे होणे आवश्यक होते ते उद्धव ठाकरे यांच्याकडून झाले नाही. गुवाहाटीवरून हे आमदार मंत्री मुंबईत येऊ शकणार नाहीत आणि आले तर त्यांना विधान भवनाची पायरी चढता येणार नाही अशी दमबाजी करण्यात आली, परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यावेळी कुठल्याही प्रतिक्रिया उमटल्या नाहीत. गद्दार, ५० खोके इथपर्यंत झाले, पण त्याचा परिणाम मात्र कुठे झाला असे दिसून आले नाही. सर्वसाधारणपणे बंड करणारे आमदार हे शिवसेनेतून यापूर्वी कधी निवडून आले नाहीत. याची अनेक उदाहरणे देता येतील. भुजबळांच्या बरोबर तसेच नारायण राणे यांच्या सोबत गेलेले आमदार पुन्हा विधानसभेत दिसले नाहीत. मात्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जे बंड झाले त्यामध्ये बंडखोर आमदार निवडून आले. याशिवाय शिंदे समर्थकांचा आकडाही ४० चा ५३ वर गेला. तेथूनच मूळ शिवसेना ही गलितगात्र होऊ लागली, ती आजतागायत.

राज्यात महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत व १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या. या सर्व निवडणुकीत महायुती ही उजवी ठरली. उबाठा शिवसेना, शप राष्ट्रवादी व काँग्रेस यांचा पालापाचोळा झाला. एवढेच कशाला, नुकत्याच झालेल्या १७ विधान परिषद निवडणुकांत महाविकास आघाडीचे उमेदवार पळून गेले. अमरावतीमध्ये तर फॉर्म भरलेला काँग्रेसचा कार्यकर्ता हॉस्पिटलमध्ये जाऊन दाखल झाला. अनेक ठिकाणी उमेदवार जे दिले होते त्यांनी माघार घेतली. दुसऱ्या बाजूला महायुतीकडे उमेदवारी मिळविण्यासाठी रांगा लागल्या होत्या. ६ ठिकाणी विधान परिषदेच्या जागा बिनविरोध झाल्या. महाराष्ट्रात असे यापूर्वी कधी घडले नव्हते. विरोधक निष्प्रभ झाल्याने सत्ताधारी आघाडीवर राहिले आहेत. खरं पाहू गेल्यास विरोधक हे प्रबळ असणे आवश्यक आहे; परंतु सध्यातरी तशी परिस्थिती नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे सरकार कोसळले. तेथे भाजपला बहुमत मिळाले. आता २०-२२ खासदार भाजपचा दरवाजा ठोठावत आहेत. तमिळनाडूमध्ये डीएमके सुद्धा इंडिया आघाडीतून बाहेर पडला आहे. याचबरोबर उत्तर प्रदेशमध्येही घमासान सुरू झाले आहे. आता पुढील वर्षात ६ राज्यांत निवडणुका होत आहेत. अशावेळी प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व हे जवळजवळ संपुष्टात येत आहे. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे हे पॉवरफुल होत आहेत. ते २०२९ च्या निवडणुकीत स्वबळावर निवडणूक लढवू पाहात आहेत. तशी तयारी त्यांनी सुरू केली आहे. दुसऱ्या बाजूला उबाठा शिवसेना ही खाचखळग्यातून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहे. शिवसेनाप्रमुखांच्या कारकीर्दीत शिवसेना ही धगधगती आग होती, आता मात्र ही आग विझून केवळ धूर राहिला आहे ही शोचनीय परिस्थिती महाराष्ट्रासाठी घातक आहे. मराठी माणसांसाठी शिवसेना जिवंत राहिली पाहिजे यात वाद नाही; परंतु नेतृत्व जेव्हा दिशाहीन होते तेव्हा परिस्थिती वाईट होते हे उबाठाच्या आत्ताच्या स्थितीवरून दिसून येते.

## राशिभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी नवीन संधी मिळू शकते. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. कुटुंबीयांशी संवाद वाढेल. आरोग्याकडे लक्ष द्या.

**वृषभ :** प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. व्यवसायात सकारात्मक घडामोडी घडतील. मित्रांची मदत लाभदायक ठरेल. प्रवासाचा योग.

**मिथुन :** नवीन योजना आखण्यासाठी दिवस अनुकूल. नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. वाणीवर नियंत्रण ठेवा. आर्थिक लाभ होईल.

**कर्क :** घरगुती वातावरण आनंददायी राहील. जुन्या गुंतवणुकीतून फायदा होऊ शकतो. विद्यार्थ्यांना यश मिळेल. मानसिक समाधान लाभेल.

**सिंह :** तुमच्या कामाची दखल घेतली जाईल. महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्या. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य सामान्य राहील.

**कन्या :** नवीन संपर्क भविष्यात फायदेशीर ठरतील. व्यवसायात अपेक्षित प्रगती दिसेल. ज्येष्ठांचा सल्ला उपयुक्त ठरेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**तूळ :** भागीदारीच्या कामात यश मिळेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नातेसंबंध दृढ होतील. मनातील चिंता कमी होईल.

**वृश्चिक :** कामाचा ताण वाढू शकतो. संयम आणि नियोजन यामुळे यश मिळेल. गुप्त शत्रूंपासून सावध राहा. आरोग्याची काळजी घ्या.

**धनू :** नवीन उपक्रम सुरू करण्यासाठी दिवस चांगला आहे. शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीची संधी आहे. प्रवासातून लाभ संभवतो.

**मकर :** मालमत्तेशी संबंधित कामे मार्गी लागतील. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. आर्थिक नियोजनावर भर द्या.

**कुंभ :** नवीन कल्पनांना उत्तम प्रतिसाद मिळेल. मित्र व सहकाऱ्यांचे सहकार्य लाभेल. लघू प्रवासाचा योग आहे. मन प्रसन्न राहील.

**मीन :** आर्थिक बाबतीत चांगली बातमी मिळेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. नवीन ओळखी लाभदायक ठरतील.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# उत्पादक शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत संत्रा, मोसंबी कलमा विक्रीकरिता तयार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदूरजनाघाट** – सातपुड्याच्या पायथ्याशी मध्यप्रदेशच्या सिमेलगत असलेल्या जिल्हयाच्या शेवटच्या टोकावर असलेल्या वरुड तालुक्यातील शेंदूरजनाघाट परिसरात संत्रा, मोसंबी कलमा विक्रीकरीता तयार झाले असून उत्पादन शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत दिसून येत आहे. परिसरातील महत्त्वाचे समजले जाणारे संत्रा उत्पादक कलमा उत्पादनासाठी हा परिसर व येथील संत्रा कलामाची बाजारपेठ हे जगभर प्रसिद्ध आहे.



या कलमा तयार करण्यासाठी ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात ईडीलिंबु बियाची आळे पद्धतीने किंवा बेड पद्धतीने लागवड करण्यात येते आणि त्या पासूनच जंभेरी नावाचे रोपटे तयार केले जाते. हे रोपटे पावसाळ्यात दुसऱ्या जागेवर लागवड केली जाते त्याला जंभेरी लागवड असे म्हणतात त्यानंतर त्या जंभेरी रोपाचे काटे काढणे, पाने पाडणे, काड्या घासणे हे आटोपल्यानंतर साधारणतः नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात या जंभेरी रोपट्यावर संत्रा, मोसंबी, लिंबु इत्यादी डोळा चढविणे म्हणजे बांधकरी करण्याचे काम करण्यात येते. ३-४ वर्षाच्या संत्रा, मोसंबी, लिंबु झाडावरील डोळा या बांधकरी करण्याकरिता वापरला जातो. या कामाकरीता विशेष कारागिरच हे बांधकरी काम करतात, हे बांधकरी काम आटोपल्यानंतर २१ दिवसांनी त्या डोळयावर बाधण्यात आलेल्या प्लास्टिकची पट्या सोडण्यात येते व त्यानंतर एक आठवड्यानंतर चढवलेला डोळा हिरवागार असल्याचे तपासून हे विशेष कारागीर डोळाच्या वर काही अंतर सोडून कापतात त्याला कातर पाडणे असे म्हणतात. त्यानंतर खात, फवारणी, उखरणी पाणी ओलीत करुन त्या डोळयातून निघणारा अंकुर जोमाने वाढवला जातो. त्यापासून संत्रा, मोसंबी, लिंबुच्या कलमा तयार होतात. संत्रामध्ये नागपुरी संत्रा, रंगपुर व नवीन जात एलिमो या असून मोसंबीमध्ये न्यू सेलर व गावराणी या प्रकारच्या कलमा तयार केल्या जातात. या परिसरात संत्रा व संत्रा कलमा या दोन पिकावरच शेतकरी व शेतमजुर अवलंबून आहे. जर संत्रा कलमा व संत्राला चांगला भावाने विकला गेला तरच शेतकरी व शेतमजुरांचे वर्ष चांगले जाते आणि मजुराला काम मिळते परंतू दोन तीन वर्षापासून संत्राला भाव नसल्याने संत्रा उत्पादक अडचणीत आले आहेत तर संत्रा कलमाला यावर्षी तरी समाधानकारक भाव मिळेल, अशी अपेक्षा आहे.

> ◆ यावर्षी मागील वर्षीच्या तुलने कलमाची लागवड कमी असून या वर्षाला संत्रा कलमांना चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा आहे कारण दिवसांनं दिवस कलमा तयार करायला लागणारा खर्च फवारणी करण्याकरिता लागणारे कीटकनाशक औषधे, खते, मजुरी व इतर खर्च वाढत आहे त्यामुळे यावर्षी संत्रा कलमांना चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा आहे.
>
> **–कलमा उत्पादक शेतकरी विलास झाडे शेंदुरजनाघाट**

शेंदुरजनाघाट परिसरात तिवसाघाट, सातनुर, वाई, रवाळा, धनोडी, पुसली, मालखेड आदी भागात संत्रा, मोसंबी, लिंबू कलमा तयार झाल्या असून या परिसरातील कलमा महाराष्ट्रसह, राजस्थान, मध्यप्रदेश व इतर राज्यात सुद्धा या परिसरातून कलमा घेण्याकरिता शेतकरी येत असतात. वरुड तालुक्यात शासन परवानाधारक ३६५ नर्सरी धारक शेतकरी असून शासनामार्फत त्यांच्याकडून भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, ग्रामीण महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजना व व नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजने अंतर्गत फळबाग लागवडीकरित शासकीय लाभार्थी शेतकरी कलमा खरेदी करतात.

संत्रा कलमा निर्मितीचा प्रक्रियेला ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात सुरुवात होते. ईडीलिबुंच्या झाडाला येणाऱ्या फळातुन बि काढून ते सावलीमध्ये सुकवल्या जाते नंतर चौकोनी आळे पद्धत किंवा बेड पद्धतीने लागवड करुन त्यापासुन रोपटे तयार करतात. हे जुलै, ऑगस्ट या महिन्यात ही रोपटे ८ ते ९ इंच अंतरावर शेतामध्ये लावले जातात. नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यात ३ ते ४ वर्षाच्या संत्रा किंवा मोसंबीच्या झाडावरील कलम काढुन डोळा चढवला जातो. त्यापासुन जो अंकुर निघते, त्याची वर्षेभर योग्य जोपासना करतात तेव्हा संत्रा, मोसंबी, लिंबू उत्तम दर्जाच्या कलमा तयार होते. त्या कलमाची विक्री पावसाळ्याच्या सुरुवात पासूनच केली जाते. किंवा येथे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार या परिसरातून कलमा राजस्थान मध्यप्रदेश व इतर राज्यात पाठवल्या जातात सगळीकडे चांगला पाऊस झाल्यावर येथील कलमा घेण्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात येत असतात त्यामुळे आता संत्रा उत्पादक शेतकरी चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत दिसून येत आहे.

लिंबू वर्गीय कलमा तयार करतांना लहान मुलांसारखीच काळजी घ्यावी लागते, तंत्रज्ञान व मार्गदर्शन असल्यास या व्यवसाय भरभराट येईल, उत्तम प्रतीचा संत्रा कलमा जगभरात जाऊन शेतकरी सुजलाम सुफलाम होईल, याकरीता संशोधन केंद्राची शाखा वरुड, शेंदुरजनाघाट येथे सुरु करावी व संत्रा मोसंबी कलम उत्पादकांना मार्गदर्शन करावे, अशी मागणी कलम उत्पादक शेतकरी तुळशीराम वंजारी यांनी केली आहे .



**वरुड** : शहरातील भाजपा जेष्ठ कार्यकर्ते भारत खासबागे यांची भा.ज.प.जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्या निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना माजी नगरसेवक ॲड.योगेश चौधरी, कंत्राटदार दिनेश लाडूकर व प्रणव बोंडे.

## मानवी बळी घेणारी वाघीण जेरबंद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**गोंदिया** – महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये दहशत पसरवणाऱ्या आणि दोन व्यक्तींचा बळी घेणाऱ्या एका वाघिणीला रविवारी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी जेरबंद केले. ट्रॅकिंग कॉलरवरून 'टी २७' अशी ओळख पटलेली ही वाघीण १९ मार्च ते २४ एप्रिल दरम्यान एका पुरुष आणि एका महिलेच्या मृत्यूला कारणीभूत ठरली होती, तर अन्य दोन व्यक्ती तिच्या हल्ल्यात जखमी झाल्या होत्या. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, वाघिणीच्या एका पुढच्या पायाला दुखापत झाल्यामुळे ती सोप्या शिकारीच्या शोधात मानवी वस्त्यांजवळ येत होती. सुमारे दोन महिने वनविभागाला गुंगारा दिल्यानंतर, अखेर साकोली तालुक्यातील आमगाव बुज येथे एका उसाच्या शेतात या वाघिणीला पकडण्यात आले. तिला पुढील उपचारांसाठी नागपूर येथील गोरेवाडा बचाव केंद्रात (ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर) हलवण्यात आले आहे.



## अनेक अधिकारी म्हणतात की, मी सुद्धा ठडड ची चड्डी घातलीय, भाजपच्या मंत्र्याचं मोठं वक्तव्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मध्य प्रदेशचे नगरविकास मंत्री कैलाश वियजवर्गीय यांनी भोपाळ येथील एका कार्यक्रमात मोठं वक्तव्य केलं आहे. भाजपचं सरकार सत्तेत आल्यानंतर अनेक सरकारी अधिकारी स्वतःला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडू लागले आहेत. अनेक अधिकारी असं म्हणतात, की, मी सुद्धा आरएसएसची चड्डी घातली आहे असे मंत्री कैलाश वियजवर्गीय म्हणाले. या संघटनेचा विस्तार वेगाने होत असला, तरी आज त्यात 'चांगल्या माणसांची' कमतरता जाणवत आहे, असंही ते म्हणाले.



दरम्यान, मध्य प्रदेशचे नगरविकास मंत्री कैलाश वियजवर्गीय यांनी केलेल्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरु आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्याचा व्हिडीओ जोरदार व्हायरल होत आहे.

राज्यात अधिकारी आणि आरएसएस यांच्यातील संबंधांवरुन वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपलं संटन वाढत आहे. आपली विचारधारा वाढत असल्याचेही ते म्हणाले. आमचे सरकार आल्यापासून अधिकारी सांगत आहेत की आमचे वडील शाखेत जात होते,. पण आमचं सरकार येण्याच्या आधी कोणी सांगत नव्हते असे देखील मंत्री कैलाश वियजवर्गीय म्हणाले. आता वाढणाऱ्या गर्दीत चांगल्या माणसांची कमी आहे. महाराष्ट्रात देखील आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांनी सकल हिंदू समाज संमेलनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं कौतुक केल्याचा व्हीडिओ गुरुवारी (२६ जून) व्हायरल झाला होता. काँग्रेसनं त्यावर टीका करत व्हीडिओ शेअर केला.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४०/२०२६** **ने.ता.०१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) सुरेश झोडबाजी कांबळे, वय अं.६५ वर्ष, धंदा-मजुरी
रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

२) सिंधुबाई शंकरराव बनकर, वय अं.६२ वर्ष, धंदा- गृहिणी
रा.नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत झोडबा बालाजी कांबळे व मयत जनाबाई झोडबा कांबळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-१९१/२०२५-२६ दि.०५/०५/२०२६**

**-: जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **पल्लवी राजेंद्रसिंह खुटपळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे पल्लवी राजेंद्रसिंह खुटपळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०७/०६/१९९१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी ०६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२३९/२०२५-२६ दि.२६/०५/२०२६**

**-: जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **रमेश नारायण हरले, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगा नामे प्रतिक रमेशराव हरले, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०८/०९/२०००** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२७०/२०२५-२६ दि.२६/०५/२०२६**

**-: जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती अरुणा वामन घोरमाडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत ढगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **श्रीमती स्वत: नामे अरुणा वामन घोरमाडे, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, यांचा जन्म दि.०५/०७/१९६२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

# मुरुडच्या मच्छिमारांसाठी ‘रापण’ उदरनिर्वाहाचे वरदान, पावसाळ्यात पारंपरिक मासेमारीला प्राधान्य : फीलसा माशाला बाजारात चांगला दर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुरूड-जंजिरा** – राज्य शासनाने सागरी जैवसंपत्तीचे संवर्धन आणि माशांच्या प्रजननाला चालना मिळावी, यासाठी दरवर्षी १ मे ते ३१ जुलै या कालावधीत यांत्रिक सागरी मासेमारीवर बंदी घातली आहे. या दोन महिन्यांच्या बंदीमुळे खोल समुद्रात मासेमारी बंद असली तरी मुरूडमधील कोळी बांधवांनी उदरनिर्वाहासाठी पारंपरिक ‘रापण’ मासेमारीचा आधार घेतला आहे. सध्या मुरूडच्या विविध समुद्रकिनाऱ्यांवर मच्छिमार बोटी न नेता किनाऱ्यालगत रापणच्या सहाय्याने मासेमारी करताना दिसत आहेत. या पारंपरिक पद्धतीमुळे अनेक कुटुंबांना रोजगार मिळत असून त्यांच्या उदरनिर्वाहाला हातभार लागत आहे. मात्र, पावसाळ्यातील खराब हवामान, समुद्रातील बदलती परिस्थिती, मासळीचे घटलेले प्रमाण तसेच एलईडी आणि पर्सनेट बोटींकडून होणाऱ्या कथित अनधिकृत मासेमारीमुळे स्थानिक मच्छिमारांच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याची भावना कोळी बांधवांनी व्यक्त केली. तरीही शासनाच्या नियमांचे पालन करत पारंपरिक रापणच्या माध्यमातून मासेमारी सुरू ठेवली आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९९/२०२६** **ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :-** विनोद आनंदराव कंगाले, वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती, रा.पांढरघाटी,ता.वरुड, ह.मु.रा.तळेगाव शा.पंत, ता.आष्टी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) विमल आनंदराव कंगाले, वय अं.६० वर्ष, धंदा-शेती, २) भरत आनंदराव कंगाले, वय अं.३२ वर्ष, धंदा-शेती, ३) पुजा आनंदराव कंगाले, वय अं.३० वर्ष, धंदा-घरकाम, ४) सुनिता आनंदराव कंगाले, वय अं.२८ वर्ष, धंदा-घरकाम, गैरअर्जदार क्र.१ ते ४ रा.लोणी रोड, हिवरखेड

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत आनंदराव चैतरामजी कंगाले, रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३३/२०२६** **ने.ता.३१/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) शोभा प्रभाकरराव तरार, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम
२) शरद प्रभाकरराव तरार, वय अं.४३ वर्ष, धंदा- मजुरी
३) लिलाधर प्रभाकरराव तरार, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
४) जगदीश प्रभाकरराव तरार, वय अं.४१ वर्ष, धंदा- मजुरी
रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रभाकर तुकारामजी तरार, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८४/२०२६** **ने.ता.०४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती त्रिवेणीबाई शंकरराव पवार, वय अं.७४ वर्ष, धंदा-गृहीणी, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.पारडसिंगा, ता.काटोल, जि.नागपूर, २) दुर्गा उत्तम बरोदे, वय अं.४४ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.पारडसिंगा, ता.काटोल

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत शंकर नागोजी पवार, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८२/२०२६** **ने.ता.१७/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती माधुरी मनोज शेलुरे, वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी
२) गौरव मनोज शुलुरे वय अं.२३ वर्ष, धंदा- शिक्षण
रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, नंदनवन कॉलनी, नागपूर, ता. जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** विनय सुदाम शेलुरे, वय अं.५१ वर्ष
धंदा-नोकरी, रा.रामकृष्ण कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रेखा पुरुषोत्तम अकर्ते, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# ‘यूपीआय’ला अख चे बळ मिळणार, रोज १०० कोटी व्यवहाराचे लक्ष्य : एनपीसीआयचे सीईओ दिलीप आसबे यांची माहिती

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




***नवी दिल्ली*** – देशातील गल्लीगल्लीत सध्या ऑनलाइन पेमेंट सुरू आहे. ५ रुपयांपासून १ लाखापर्यंतचे दैनंदिन व्यवहार सध्या होत आहेत. आता यूपीआयचे व्यवहार रोज १०० कोटींवर नेण्यासाठी ‘एआय’चा वापर केला जाणार आहे, अशी माहिती एनपीसीआयचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप आसबे यांनी दिली. ते म्हणाले की, देशात डिजिटल पेमेंटचे प्रमाण सातत्याने वाढत असून, देशातील युनिफाइड पेमेंट इंटरफेस म्हणजेच ‘यूपीआय’वर दररोज ७५ कोटींहून अधिक व्यवहार होत आहेत. आता आम्हाला दररोज १ अब्ज व्यवहार गाठण्यासाठी आणि पुढील ५० कोटी नवीन वापरकर्त्यांना जोडण्यासाठी ‘एआय’ (कृत्रिम बुद्धिमत्ता) ची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

यासाठी एनपीसीआय, आरबीआय आणि सरकार एकत्रितपणे काम करत आहेत, असे त्यांनी सांगितले. आसबे यांनी सांगितले की, यूपीआय नवीन वापरकर्त्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सुरक्षा हा एक महत्त्वाचा पैलू ठरेल. फसवणूक रोखण्यासाठी, बनावट खाती शोधण्यासाठी आणि सध्याच्या वापरकर्त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी ‘एआय’चा प्रभावीपणे वापर केला जाईल. यासोबतच, त्यांनी ‘एआय’च्या मदतीने व्यापारी आणि वापरकर्त्यांना सहजपणे कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही भाष्य केले. ऑनबोर्डिंग प्रक्रिया सोपी करण्यासाठी भारतीय भाषा आणि व्हॉईस आधारित उपाय तयार केले जात आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

कठोर नियमांची गरज आसबे यांच्या मते, डिजिटल व्यवहारांची वाढती संख्या पाहता भारताला मजबूत नियमांची नितांत गरज आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३९/२०२६** **ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :-**

राजेंद्र हरिभाऊ भोंडे
वय अं.५० वर्ष, धंदा-शेती
रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत हरिभाऊ देवराव भोंडे व मयत पंचफुला हरिभाऊ भोंडे, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५६/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती वृषाली दिलीप देशमुख, वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहीणी, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, ह.मु.वाघोली, पुणे, २) अभिनंदन दिलीप देशमुख, वय अं.३७ वर्ष, धंदा- खासगी नोकरी, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, ह.मु.वाघोली, पुणे, ३) अर्पण दिलीप देशमुख, वय अं.२४ वर्ष, धंदा-खासगी नोकरी, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, ह.मु.वाघोली, पुणे, ता.जि.पुणे

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिलीप गंगाधरराव देशमुख, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५६/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती ममता रामकृष्ण गाडबैल, वय अं.५० वर्ष, धंदा-गृहीणी, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, २) शिवाणी राकृष्ण गाडबैल, वय अं.२७ वर्ष, धंदा- नोकरी, ३) साक्षी रामकृष्ण गाडबैल, वय अं.२४ वर्ष, धंदा- शिक्षण, सर्व रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामकृष्ण श्रावण गाडबैल, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४२/२०२६** **ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :-**

सैय्यद रशिद सैय्यद यासिन
वय अं.६५ वर्ष, धंदा-मजुरी
रा.नया डायरा, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सैय्यद यासीन छोटु व मयत मुशरकबी यासीन सैय्यद, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# रस्त्याचे काम रखडल्याने धुळ, खडडे आणि वाहतुकीची समस्या

## मटन मार्केट ते पंचायत समिती दरम्यानचा रस्त्याबाबत अद्यापही अनिश्चितता कायम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – गेल्या अनेक दिवसांपासून वरुड शहरातील मटन मार्केट ते पंचायत समिती दरम्यानचा रस्ता होणार की नाही? याबाबत तर्कवितर्क काढले जात असताना होत असलेल्या विलंबामुळे सर्व सामान्य नागरिकांना मात्र प्रचंड हाल सोसावे लागत असून, ऐन पावसाळ्यात या रस्त्यावर प्रचंड चिखल आणि पूर सदृश्य परिस्थिती दिसून येत असल्यामुळे आता पुढे काय? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारु लागले आहेत.



"हा रस्ता अत्यंत गजबजलेला असून या रस्त्याने दररोज हजारो नागरिक ये जा करतात, जरुड मार्गावरुन शहरात प्रवेश करण्याचा हा रस्ता असून तो अत्यंत खराब असल्यामुळे शहराचे नाव खराब होत आहे, त्यामुळे या रस्त्याच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर करुन काम तातडीने सुरु करावे, अशी मागणी माजी नगरसेवक चंदू कडू यांनी केली आहे.



"या रस्त्या करीता विद्यमान आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर हे सातत्याने पाठपुरावा करीत असून ते लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या रस्त्याबाबतचे प्रलंबित प्रश्न मांडून हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढतील, अशी अपेक्षा या प्रभागाचे भाजपा नगरसेवक देवेंद्र बोडखे यांनी व्यक्त केली.



"हा रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असून यावर कोणीही काहीही बोलायला तयार नाही, आम्हा सर्वसामान्य नागरिकांना हा रस्ता व्हावा, असे वाटत आहे, तो रस्ता कोण करीत आहे किंवा त्याकरिता कोणी प्रयत्न केले, यावर आमचे काहीही म्हणणे नाही रस्ता कोणीही करा परंतु तातडीने करुन द्या, अशी मागणी किराणा व्यावसायिक अब्दुल रजाक मेमन यांनी केली आहे.

वरुड शहरातील अत्यंत महत्त्वपूर्ण समजला जाणारा मटन मार्केट ते पंचायत समिती दरम्यानचा रस्ता करिता सन २०२३ तत्कालीन आमदार देवेंद्र भुयार यांच्या विशेष प्रयत्नाने १० कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला होता. सदर निधी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मंजुर करण्यात आला होता मात्र त्यामध्ये १५ टक्के नगरपरिषदेचा स्वहिस्सा असावा, अशी अट टाकण्यात आली होती. त्यावेळी हा रस्ता श्री साई असोसिएट नागपूर व दीपक बोंद्रे जॉईट व्हेंचर या कंत्राटदारांना बांधकामासाठी प्राप्त झाला होता. या रस्त्याचे बांधकामाची ऑर्डर सुद्धा देण्यात आली.

ऑर्डर प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदारांनी सर्वप्रथम या रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब हटवुन नवीन विद्युत खांब सुद्धा टाकले होते तर काही प्रमाणात असलेले अतिक्रमण काढण्याकरीता नगरपरिषदेच्या वतीने अतिक्रमणधारकांना नोटीस सुद्धा पाठविण्यात आल्या होत्या. ही प्रोसेस सुरू असतांना आणि या प्रोसेसला लागलेल्या विलंबामुळे या रस्त्याचे बांधकाम त्यावेळी पुढे सुरू होण्याकरता व्यत्यय निर्माण झाला.

हे सर्व सुरू असतांना विधानसभेच्या निवडणुका लागल्या आणि त्या दरम्यान या रस्त्याचे काम रखडले. त्यावेळी शासनाकडे निधी नसल्यामुळे आणि प्रत्येक महिन्याला देयक सादर करुन निधी प्राप्त करा, अशा आदेश शासनाकडून प्राप्त झाल्यामुळे आणि देयक सादर करुनही पैसे प्राप्त न झाल्यामुळे कंत्राटदारांनी हे काम थांबविले. गेल्या दोन वर्षांपासून त्या रस्त्याचे काम रखडले असून तत्कालीन कंत्राटदराने केलेल्या कामाचे देयक सुद्धा शासनाकडे अद्यापही प्रलंबित आहेत. अशा स्थितीत अत्यंत गजबजलेला आणि शहराच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण समजणारा हा रस्ता अत्यंत खराब झालेल्या स्थितीत आहे. या रस्त्याने चालताना वाहन चालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते एवढेच नव्हे तर उन्हाळ्यामध्ये या रस्त्यावरील धुळामुळे व्यापारी आणि सर्वसामान्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. याबाबत अनेक तक्रारी सुद्धा करण्यात आल्या परंतु त्यावर सुद्धा कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता नगरपरिषदेने अनेकदा रस्त्यावर पाणी टाकून धूळ कमी करण्याचा प्रयत्न केला परंतु कायमस्वरूपी उपाय योजना मात्र नगर परिषदे कडून करण्यात आली नाही.

या रस्त्याचे बांधकाम आता होणार की नाही? आणि होणार तर कधी? याबाबत अनिश्चितता कायम आहे. एक तर शासनाकडे निधी नाही आणि दुसरीकडे नगरपरिषदेकडे स्वहिस्सा जी रक्कम भरायची आहे ती रक्कम उपलब्ध नाही. अशा स्थितीत विद्यमान आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला परंतु त्याला सुद्धा पाहिजे त्या प्रमाणात यश येऊ शकले नाही.

अशा स्थितीत या रस्त्याच्या निधी बाबतचा निर्णय आता शासनाकडे प्रलंबित असून शासन काय निर्णय घेतो? यावर या रस्त्याचे भविष्य अवलंबून राहणार आहे. दुसरीकडे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून सद्य: पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे या खड्डयांमध्ये पाणी साचून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे त्यावर सुद्धा उपाययोजना करणे गरजेचे आहे अन्यथा नागरिकांकडून आंदोलनाचे हत्यार उपवासल्या जाण्याची शक्यता आहे.

## पर्यटकांची खासगी ट्रॅव्हलर बस दरीत कोसळली: दोघांचा मृत्यू, अनेक जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***राजगड*** – पुणे जिल्ह्यातील राजगड तालुक्यातील पाबे घाटात शनिवारी (दि.२७) उशिरा रात्री भीषण अपघात झाला. मुंबईहून राजगड किल्ल्यावर फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांची खासगी ट्रॅव्हलर बस खोल दरीत कोसळल्याने दोन जणांचा मृत्यू झाला, तर अनेक प्रवासी जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, अंधेरी (पूर्व), मुंबई येथून सुमारे २० पर्यटक बसमधून राजगड किल्ल्यावर आले होते. प्रवासात पावसामुळे निसरड्या झालेल्या घाटरस्त्यावर बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर बस खोल दरीत कोसळली आणि अनेक वेळा पलटी झाली. मुसळधार पाऊस, अंधार आणि कठीण भौगोलिक परिस्थिती असूनही रात्रभर बचावकार्य सुरू ठेवण्यात आले. बसमध्ये अडकलेल्या सर्व जखमी प्रवाशांना बाहेर काढून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### सिंभोरा झिरो पॉईट मत्स्य संकलन केंद्राच्या गोडाऊनमधून

# चेतन सुरजूसे याचेसह इतरांविरुध्द मोर्शीत चोरीचा गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – अप्पर वर्धा धरण (नळदमायंती सागर) क्षेत्रातील झिरो पॉईट मत्स्य संकलन केंद्राच्या गोडाऊनमधून १ लाख २० हजार रुपये किंमतीचे फायबर कॅरेट आणि २० हजार रुपयांचे वजनकाटे असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात व नामजद आरोपींनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मोर्शी पोलीस स्टेशनमध्ये ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, जवाहर नगर मोर्शी येथील रहिवासी व व्यावसायिक प्रमोद घनश्याम साहु (वय ४७) यांनी राजुरा बाजार येथील वासुदेव सुरजुसे यांच्या नावावर असलेले अप्पर वर्धा मच्छी संकलन केंद्र झिरो पॉईट नळदमयंती सागर मत्स्य उत्पादक व मत्स्य व्यवसाय मच्छीमारी संस्था मर्या. राजुरा बाजार अंतर्गत अप्पर मच्छी तलावाचा ठेका विदर्भ फिशिंग अँड ट्रेडिंग ऑफिस पार्टनरशिप अंतर्गत १ कोटी ४ लाख रुपयांमध्ये दोन भागीदारांनी मिळून घेतला होता. या ठेक्याचा अंतिम करारनामा सुरजुसे यांच्यासोबत होणे बाकी असतानाच, हप्ता भरण्यावरुन हा मच्छी व्यवसाय सध्या बंद करण्यात आला होता. व्यवसाय बंद असल्यामुळे फिर्यादी प्रमोद साहु यांनी त्यांचे नीलकमल कंपनीचे फायबर कॅरेट आणि मासे मोजण्याचे लोखंडी काटे वेगवेगळ्या पॉईट्सवर सुरक्षित ठेवले होते. यापैकी झिरो पॉईट येथील टिनाचे शेड असलेल्या गोडाऊनमध्ये १३५ फायबर कॅरेट ठेवलेले होते. गेल्या २६ जून रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास फिर्यादी साहु हे झिरो पॉईट मच्छी केंद्रावर गेले असता, तेथील कर्मचारी मंगेश नांदणे रा.मोर्शी आणि राजेंद्र पोहणे रा.वघाळ यांनी त्यांना चोरीची माहिती दिली. २५ जूनच्या रात्री दरम्यान आरोपींनी गोडाऊनच्या टिनाचे शटर उघडून कोणतीही पूर्वकल्पना न देता १३५ नग फायबर कॅरेट किंमत १ लाख २० रुपये आयसर गाडीत टाकून चोरुन नेले तसेच धरणावरील वेगवेगळ्या पॉईट्सवरुन मासे मोजण्याचे ११ लोखंडी काटे किंमत २० हजार रुपये सुद्धा लंपास केले. या प्रकरणी फिर्यादी प्रमोद साहु यांच्या जबानी रिपोर्टवरुन मोर्शी पोलिसांनी चेतन वासुदेव सुरजुसे (३०), बाबुराव अमझरे (४५) दोन्ही रा.राजुरा बाजार, नितीन ठाकरे (४०) रा.हातुर्णा, सचिन (३०) रा.बोरगाव बेडा साहूर, जि.वर्धा व इतरांविरुद्ध बेकायदेशीरपणे साहित्य चोरुन नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# विद्युत पंपाचा शॉक लागुन विवाहीतेचा मृत्यू

### शहापूर पुनर्वसन येथील हृदयद्रावक घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***वरुड*** – शहरातील आंबेडकर चौकातील रहिवासी असलेल्या एका २० वर्षीय विवाहितेचा माहेरी पाणी भरताना पाण्याच्या विद्युत पंपचा तीव्र शॉक लागुन दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना काल (ता.२७) सकाळी ९ वाजताच्या सुमारास शहापूर पुनर्वसन येथे घडली.

प्राप्त माहितीनुसार, निकिता विशाल शर्मा (वय २० वर्ष) हिचा विवाह ४ वर्षांपूर्वी आंबेडकर चौक परिसरातील विशाल शर्मा यांच्याशी झाला होता. गेल्या महिनाभरापासून निकिता वरुड शहरापासून जवळच असलेल्या शहापूर पुनर्वसन येथे माहेरी पाहुणचारासाठी आली होती. काल सकाळी ९ वाजताच्या सुमारास शहा-पूर येथील घरात तिची आई झोपलेली होती. याच दरम्यान नळाला पाणी आले. निकिताने नेहमीप्रमाणे पाणी भरण्यासाठी विजेवर चालणारा पंप सुरू केला. पाणी भरुन झाल्यानंतर विद्युत पंपची वायर (प्लग) बोर्डातून काढत असताना तिला विजेचा प्रचंड तीव्र झटका लागला. विजेचा शॉक इतका तीव्र होता की, निकिता थेट जमिनीवर कोसळली. ती खाली पडल्याचा मोठा आवाज झाल्याने तिची आई तातडीने जागी झाली. निकिताला निपचित पडलेले पाहून आईने आरडाओरड केली. त्यानंतर आजूबाजूच्या शेजाऱ्यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. गंभीरावस्थेत निकिताला तात्काळ वरुड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती तिला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच वरुड पोलिसांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून शवविच्छेदन करुन कुटूंबियांच्या स्वाधीन केला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पो-लीस पुढील तपास करत आहेत.

